**ई – फाईल**

**दि. १६–०१–२०२४ रोजीचे प्रतिवादीचे प्रतिदाव्यास विना कैफियत म्हणणे चा आदेश रद्द करणेच्या अर्जावरील आदेश**

सदरचा अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी यांच्या प्रतिदाव्यास मुदतीमध्ये कैफियत, म्हणणे दाखल न केल्याने झालेल्या विना कैफियत, म्हणणे प्रतिदावा चालविणेचा आदेश रद्द करणेसाठी केलेला आहे. अर्जातील कथन पुढील प्रमाणे, सदर वादी म्हणजेच आय.डी.बी.आय. बँक यांनी त्यांचे माहितगार वकिल यांना वेळेमध्ये माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध करुन न दिल्याने वादी यांना प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास (Counter claim) कैफियत, म्हणणे दाखल करणे अशक्य झाले होते.

सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविले. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज व त्यातील कथने प्रतिवादीस मान्य व कबुल नाहीत, अर्ज मंजूर होण्यासाठी कोणतेही संयुक्तीक कारण वादीने दिले नाही. तसेच यदा कदाचित हा अर्ज मंजूर करणेचा झालेस वादींवर जास्तीत–जास्त खर्च बसविणेत यावा.

अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. ई–फाईलचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, या न्यायालयाने नि. १ खाली दि. ०१/०१/२०२४ रोजी "प्रतिदाव्यास मुदतीत म्हणणे दिलेले नाही म्हणून विना कैफियत, म्हणणे प्रतिदावा चालविणेचा आदेश" पारित केला होता. वादीचे वकीलांचे म्हणणे नुसार त्यांना पक्षकाराकडून माहिती वेळेत उपलब्ध झाली नाही. सदरचे कारण हे हा अर्ज मंजूर करण्यासाठी (sufficient cause) पुरेसे वाटत नाही, अशा बाबींमुळे न्यायालयाच्या प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता असते. परंतू न्यायाच्या हिताच्या दृष्टीने वादी यांना एक संधी देणे क्रमप्राप्त वाटते. तसेच प्रतिवादी यांचा प्रतिदावा (Counter claim) हा वादी विरुध्द नुकसान भरपाईसाठी असलेने त्यावर वादींचे म्हणणे मागवून घेणे नैसर्गिक न्याय तत्वांचे प्रमाणे क्रमप्राप्त ठरेल. वरील बाबींचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

# आ दे श

१. ई–फाईल मधील वादीचा दि. १६/०१/२०२४ रोजीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. ०१/०१/२०२४ रोजी "प्रतिदाव्यास मुदतीत म्हणणे दिलेले नाही म्हणून विना कैफियत, म्हणणे प्रतिदावा चालविणेचा आदेश" रद्द करण्यात यावा.

३. सदरचे प्रकरण हे सुनावणीस आल्याने, वादी यांनी पुढील तारखेस न चुकता आपला पुरावा सादर करावा असे आदेश वादींना देण्यात येतात. सदर आदेशाची उभयपक्षांनी नोंद घ्यावी.

४. सदर अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

sd/-

सांगली. ( श्री. ओ. एस. शास्त्री )

दिनांक – ०६/०२/२०२४. ११ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.